मूल्यवर्धन
शांतिलाल मुथ्था फाउंडेशन

## संवेधानिक मूल्ये

न्याय
स्वातंत्र्य
समता
बंधुता

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे आणि शांतिलाल मुथ्था फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मूल्यशिक्षणाचा कार्यक्रम

### मूल्यवर्धन संकल्पना

- शालेय विद्यार्थी भविष्यात लोकशाहीचे जबाबदार, संवेदनशील व कर्तबगार नागरिक बनावेत म्हणून संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता ही मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये इयत्ता १ ली पासून रुजविणे.
- बालस्नेही व विद्यार्थीकेंद्रित पद्धतीने आनंददायी वातावरणामध्ये सहयोगी अध्ययन व ज्ञानरचनावादावर आधारित शिक्षण पद्धतीचा वापर करून, विविध कृती, वर्ग उपक्रम आणि शालेय उपक्रम याद्वारे सातत्याने आणि सुनियोजित रीतीने संधी उपलब्ध करून देणे ही मूल्यवर्धन कार्यक्रमाची संकल्पना आहे.

## मूल्यवर्धन कार्यक्रमाची मुख्य वैशिष्ट्ये

- भारतीय राज्यघटना, शिक्षण हक्क कायदा २००९, राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१० यावर आधारित आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांनी आढावा घेतलेला कार्यक्रम
- मूल्यांच्या बोधात्मक, भावात्मक आणि क्रियात्मक पैलूंचा विचार
- बालस्नेही व विद्यार्थीकेंद्रित अध्ययन-अध्यापन पद्धत
- शालेय अभ्यासक्रमाशी निगडीत
- समग्र शाळा दृष्टिकोन (होल स्कूल ॲप्रोच) : शाळेचे वातावरण, सर्वसाधारण व्यवहार, दैनंदिन कार्यक्रम यांतून विद्यार्थ्यांना मूल्ये आत्मसात करण्याची संधी
- लवचिकता : शाळांच्या गरजा, प्राधान्यक्रम, उपलब्ध असणारी साधनसामग्री यानुसार आवश्यक वाटतील असे बदल करून हा कार्यक्रम राबविता येतो

## मूल्ये, कौशल्ये व क्षमता




## मूल्यवर्धन अंमलबजावणी पध्दत



महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये शिक्षक आणि मुख्याध्यापकांसाठी ११,६३७ कार्यशाळांचे आयोजन

९,६३० शिक्षकांना मूल्यवर्धनचे प्रशिक्षक (प्रेरक) हा दर्जा

प्रेरकांमार्फत १,७०,००० शिक्षकांना प्रशिक्षण

प्रशिक्षणात सर्व चारही दिवस शिक्षकांची ९०% उपस्थिती

गुणवत्तेच्या देखरेखीसाठी ७७,७४६ वर्गनिरीक्षणे

## पार्श्वभूमी

शांतिलाल मुथ्था फाउंडेशनने या कार्यक्रमाची निर्मिती केली असून इ.स.२००९ ते २०१५ ह्या ६ वर्षांच्या कालावधीत जि.प.च्या ५०० शाळांमध्ये तो यशस्वीरीत्या राबविला गेला. याचे मूल्यमापन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील वेगवेगळ्या संस्थांनी केले. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल घडत असल्याचे संशोधनातून निष्पन्न झाले. या सर्व अनुभवांनंतर शांतिलाल मुथ्था फाउंडेशनने मूल्यवर्धनचा सुधारीत आराखडा तयार केला. तसेच इयत्ता १ली ते ५वीचा अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांसाठीच्या उपक्रम पुस्तिका व शिक्षकांसाठीच्या मार्गदर्शन पुस्तिका तयार केल्या. त्यावर SCERT च्या तज्ञ समितीद्वारे योग्य ते परीक्षण करून या आराखडा व अभ्यासक्रमास मान्यता देण्यात आली.

## मूल्यवर्धनचा विस्तार

### महाराष्ट्र राज्य

| वर्ष | जिल्हे | तालुका | केंद्र | शाळा | विद्यार्थी | प्राथमिक शिक्षक |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१६-१७ | ३४ | ३७ | ६३ | ७२४ | ३७०३२ | १९१५ |
| २०१७-१८ | ३५ | १०७ | १६१८ | १८५७२ | ९३३६७१ | ५०८८७ |
| २०१८-१९ | ३६ | ३५६ | ३५७२ | ४०२३१ | २२६५२४९ | ११५१४६ |
| २०१९-२० | ३६ | ४०८ | ५५७८ | ६७००० | ४४००००० | १९५००० |

### गोवा राज्य

| वर्ष | जिल्हे | तालुके | शाळा | विद्यार्थी | शिक्षक |
|---|---|---|---|---|---|
| २०१६-१७ | २ | १२ | १९१ | १०२९७ | २०० |
| २०१७-१८ | २ | १२ | ७८१ | २२०५६ | १७११ |
| २०१८-१९ | २ | १२ | १२६२ | २४०००० | ९७०० |

### गुजरात राज्य

| वर्ष | जिल्हे | तालुके | शाळा | विद्यार्थी | शिक्षक |
|---|---|---|---|---|---|
| २०१९-२० | १ | ०३ | ३१६ | २२८७९ | १००७ |

## विद्यार्थ्यांमधील अपेक्षित फलनिष्पत्ती

- स्वजाणीव आणि स्वव्यस्थापन कौशल्ये दर्शवितात.
- स्वतंत्र, चिकित्सक विचार आणि जबाबदारीने निर्णय घेण्याची क्षमता दर्शवितात.
- स्वतःशी तसेच इतरांशी संबधित समस्यांच्या संदर्भात नाविन्यपूर्ण उपाय शोधू शकतात.
- इतरांबद्दल काळजी आणि आस्था दर्शवितात.
- विविधता ओळखून तिचा सहजपणे स्वीकार करतात.
- एकमेकातील संबंध आदरयुक्त रीतीने जोपासण्याचे कौशल्य दाखवितात.
- कुटुंब, शाळा आणि स्थानिक समुदायाच्या भल्यासाठी कृतीशील योगदान देतात.

## शालेय वातावरणातील अपेक्षित फलनिष्पत्ती

- सुरक्षित, भयमुक्त, समावेशक, आस्थापूर्ण व न्यायपूर्ण शालेय वातावरण निर्माण करणारे नेतृत्व विकसित करणे.
- बालकाच्या सुरक्षिततेची काळजी घेणारे, बालस्नेही वातावरण असणारे, मूल्याधारित क्षमता विकसनासाठी पूरक अशा पद्धतींचा अवलंब करणारे वर्ग विकसित करणे.

## शासकीय यंत्रणेचा प्रभावी सहभाग

मागील १० वर्षातील मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री, प्रधान सचिव, शिक्षण आयुक्त, प्राथमिक विभागाचे शिक्षण संचालक, SCERT संचालक आणि अधिकारीवर्ग, शिक्षणाधिकारी, DIET अधिकारी, जिल्हा व तालुकापातळीवरील मूल्यवर्धन नोडल ऑफिसर्स, विस्तार अधिकारी, तसेच महाराष्ट्रातील सर्व जिल्हा परिषद व स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकारी व शिक्षक, मुख्याध्यापक आणि केंद्रप्रमुख या सर्वांनी अथक परिश्रम घेऊन हा कार्यक्रम यशस्वी केला आहे स्वातंत्र्य काळानंतर घटनात्मक मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रूजविण्याचा हा भारतातील सर्वात मोठा यशस्वी प्रयोग म्हणता येईल.

**शांतिलाल मुथ्था फाउंडेशन**

8 वा मजला, मुथ्था चेंबर्स -2, सेनापती बापट मार्ग, पुणे 411 016, महाराष्ट्र, भारत.

+91 20 6605 0000 info@mutthafoundation.org www.mutthafoundation.org